जा.क्र.भिनिशमनपा/नगरसचिव/१०, दि.०१.०३.२०२४ ची सभा सुचना अन्वये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सर्व नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांची दि.०५.०३.२०२४ रोजी प्रशासकीय समितीची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त, अतिरीक्त आयुक्त, उपायुक्त (मु.), उपायुक्त (कर), मुख्य लेखा व वित्त अधिकारी, शहर अभियंता, सहा.संचालक (नगररचना) व नियंत्रण अधिकारी/विभाग प्रमुख, इ. उपस्थित होते. या प्रशासकीय समितीच्या बैठकीमध्ये सन २०२३-२४ चे सुधारीत व सन २०२४-२५ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर साधकबाधक चर्चा करण्यात आलेली आहे.

दिनांक 11/03/2024

प्रशासकीय ठराव क्र. 405

**विषय : सन २०२३-२४ चे सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२४-२५ करीता मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंजुरी देणेबाबत...**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.एम.सी.ओ.२००२/प्र.क्र.७१ (भाग २)/नवि-१४, दि.०६.०६.२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम क.४५२ अ च्या तरतूदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारा नुसार (मा.महासभा व मा.स्थायी समितीचे अधिकार) मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, सन २०२३-२४ चे सुधारीत रु.७९६,३५.१७ लाख व सन २०२४-२५ चे रक्कम रू.९५६,९६.९८ लाख रकमेचे रु.२७.८३ लाख शिल्लक दर्शविणारे मुळ अंदाजपत्रकास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम क.९६ व १०० नुसार मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.
## आस्थापना विभाग

जा.क्र./भिनिशमनपा/आस्थापना/८३०/२०२४
दि. ११ / ०३ /२०२४.

**प्रति,**
**मा.प्रशासक तथा आयुक्त,**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

**विषय :-** महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत वाहनचालक यांना अतिकालीन भत्ता (ओव्हर टाईम) लागु करणेबाबत.

**संदर्भ :-** १. मा.सचिव, भिवंडी युनिट, शासकीय वाहनचालक संघटना मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.१६/१०/२०२३, रोजीचे या कार्यालयाकडे दि.१८/१०/२०२३, रोजी प्राप्त पत्र.
२. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अकाभ-२०२२/प्र.क्र.०७/सेवा-६, दि.०७/०८/२०२३.

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भ क्र.१ मा.सचिव, भिवंडी युनिट, शासकीय वाहनचालक संघटना मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र प्राप्त झाले असून त्याव्दारे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत वाहनचालक यांना अतिकालीन भत्ता (ओव्हर टाईम) मिळणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

सदर वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अकाभ-२०२२/प्र.क्र.०७/सेवा-६, दि.०७/०८/२०२३ नुसार वाहन चालकांना मिळणाऱ्या अतिकालिक भत्त्याच्या कामाच्या वेळेमध्ये व प्रचलित दरामध्ये वाढ करण्यात आलेली असून शासनाचे विविध विभाग व त्याखालील निरनिराळ्या कार्यालयातील वाहन चालकांना ९ तास ४५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ काम केल्यास खालील शर्तीच्या अधिन राहून रु.१००/- प्रति तास या दराने अतिकालिक भत्ता लागु केलेला आहे.

१. कामाच्या दिवशी ९ तास ४५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ काम केल्यास (भोजन समय धरुन) आणि रविवार सुटीच्या दिवशी सुद्धा काम केल्यास दर तासाला रु.१००/- (अर्धा तास किंवा जास्त काम केल्यास पूर्ण तास धरण्यात येईल.)
२. वाहन चालकास एका महिन्यात मिळणारी अतिकालिक भत्त्याची एकूण रक्कम त्याच्या एकूण पगार (salary) ३०% पेक्षा जास्त असू नये.

त्याचप्रमाणे वाहन चालकांना सुधारित दराप्रमाणे सदर अतिकालिक भत्ता मंजूर करण्याबाबतचे अधिकार पूर्वीप्रमाणेच वाहनचालक ज्यांचे नियंत्रणाखाली काम करतात, त्या विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना राहतील याप्रमाणे सदर शासन निर्णयामध्ये नमूद आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या आस्थापनेवर एकुण ७८ वाहनलचालक कार्यरत असून ते महानगरपालिकेच्या विविध विभागांत कार्यरत असून सदर वाहनचालकांना उक्त संदर्भ क्र.१. मा.सचिव, भिवंडी युनिट, शासकीय वाहनचालक संघटना मंत्रालय यांचेकडील प्राप्त पत्राचे अनुषंगाने अतिकालीन भत्ता (ओव्हर टाईम) लागु करणेबाबत उक्त संचिकेत नमूद प्रमाणे कार्यरत ७८ वाहनचालकांपैकी किती वाहनचालक ओव्हर टाईम करतात? व त्यांना ओव्हर टाईम द्यावयाचा झाल्यास आस्थापनेवर किती आर्थीक भार वाढेल? याबाबत अंदाजित माहीती घेणेकामी वाहन विभागाचा अहवाल घेण्यात आला असता वाहन विभागाने महानगरपालिकेचे मालकीची १३ मनपा वाहने मा.वरिष्ठ अधिकारी यांच्या कार्यालयीन वापराकरीता

असून सदर मनपा वाहन वापरणारे अधिकारी यांना कार्यालयीन कामानिमित्त मंत्रालय, मा.जिल्हाधिकारी कार्यालय, कोकण भवन व इतर ठिकाणी जावे लागत असल्याने सदर वाहनांवर कार्यरत असलेले वाहनचालक यांना महानगरपालिका मुख्यालय येथे बहुतांशी वेळेस उशीर होत असल्याने सदर वाहन चालकांना कामाच्या व सुट्टीचे दिवशी अतिरिक्त काम करावे लागत असल्याने अशा वाहनचालकांना अतिकालीन भत्ता (ओव्हर टाईम) देणेकामी प्रती माह अंदाजे ३२,०००/- खर्च येणार असल्याबाबत वाहन विभागाकडून अहवाल देण्यात आलेला आहे.

तरी, उक्त शासन निर्णय व वाहन विभागाकडील अहवालाचे अनुषंगाने महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले वाहनचालकांना अतिकालीन भत्ता (ओव्हर टाईम) लागु करणेकामी सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ (१) नुसार प्रशासकीय व आर्थीक मान्यता मिळणेकामी प्रस्तावीत करण्यात येत आहे.

Mahadik
२०।२।२४

(अजित महाडिक)

**प्र.सहाय्यक आयुक्त प्रशासन**

**भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका**

**विषय :-** महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत वाहनचालक यांना अतिकालीन भत्ता (ओव्हर टाईम) लागु करणेबाबत.

**संदर्भ :-** १. मा.सचिव, भिवंडी युनिट, शासकीय वाहनचालक संघटना मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.१६/१०/२०२३, रोजीचे या कार्यालयाकडे दि.१८/१०/२०२३, रोजी प्राप्त पत्र.

२. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अकाभ-२०२२/प्र.क्र.०७/सेवा-६, दि.०७/०८/२०२३.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयांकित संदर्भ क्र.१ मा.सचिव, भिवंडी युनिट, शासकीय वाहनचालक संघटना मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र प्राप्त झाले असून त्याव्दारे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत वाहनचालक यांना अतिकालीन भत्ता (ओव्हर टाईम) मिळणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

सदर वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अकाभ-२०२२/प्र.क्र.०७/सेवा-६, दि.०७/०८/२०२३ नुसार वाहन चालकांना मिळणाऱ्या अतिकालिक भत्त्याच्या कामाच्या वेळेमध्ये व प्रचलित दरामध्ये वाढ करण्यात आलेली असून शासनाचे विविध विभाग व त्याखालील निरनिराळ्या कार्यालयातील वाहन चालकांना ९ तास ४५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ काम केल्यास खालील शर्तीच्या अधिन राहून रु.१००/- प्रति तास या दराने अतिकालिक भत्ता लागु केलेला आहे.

१. कामाच्या दिवशी ९ तास ४५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ काम केल्यास (भोजन समय धरुन) आणि रविवार सुटीच्या दिवशी सुद्धा काम केल्यास दर तासाला रु.१००/- (अर्धा तास किंवा जास्त काम केल्यास पूर्ण तास धरण्यात येईल.)

२. वाहन चालकास एका महिन्यात मिळणारी अतिकालिक भत्त्याची एकूण रक्कम त्याच्या एकूण पगार (SALARY) ३०% पेक्षा जास्त असू नये.

**त्याचप्रमाणे वाहन चालकांना सुधारित दराप्रमाणे सदर अतिकालिक भत्ता मंजूर करण्याबाबतचे अधिकार पूर्वीप्रमाणेच वाहनचालक ज्यांचे नियंत्रणाखाली काम करतात, त्या विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना राहतील याप्रमाणे सदर शासन निर्णयामध्ये नमूद आहे.**

सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या आस्थापनेवर एकुण ७८ वाहनलचालक कार्यरत असून ते महानगरपालिकेच्या विविध विभागांत कार्यरत असून सदर वाहनचालकांना उक्त संदर्भ क्र.१. मा.सचिव, भिवंडी युनिट, शासकीय वाहनचालक संघटना मंत्रालय यांचेकडील प्राप्त पत्राचे अनुषंगाने अतिकालीन भत्ता (ओव्हर टाईम) लागु करणेबाबत उक्त संचिकेत नमूद प्रमाणे कार्यरत ७८ वाहनचालकांपैकी किती वाहनचालक ओव्हर टाईम करतात? व त्यांना ओव्हर टाईम द्यावयाचा झाल्यास आस्थापनेवर किती आर्थीक भार वाढेल? याबाबत अंदाजित माहीती घेणेकामी वाहन विभागाचा अहवाल घेण्यात आला असता वाहन विभागाने महानगरपालिकेचे मालकीची १३ मनपा वाहने मा.वरिष्ठ अधिकारी यांच्या कार्यालयीन वापराकरीता असून सदर मनपा वाहन वापरणारे अधिकारी यांना कार्यालयीन कामानिमित्त मंत्रालय, मा.जिल्हाधिकारी कार्यालय, कोकण भवन व इतर ठिकाणी जावे लागत असल्याने सदर वाहनांवर कार्यरत असलेले वाहनचालक यांना महानगरपालिका मुख्यालय येथे बहुतांशी वेळेस उशीर होत असल्याने सदर वाहन चालकांना कामाच्या व सुट्टीचे दिवशी अतिरिक्त काम करावे लागत असल्याने अशा वाहनचालकांना अतिकालीन भत्ता (ओव्हर टाईम) देणेकामी प्रती माह अंदाजे ३२,०००/- खर्च येणार असल्याबाबत वाहन विभागाकडून अहवाल देण्यात आलेला आहे.

सबब, उक्त शासन निर्णय व वाहन विभागाकडील अहवालाचे अनुषंगाने महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले वाहनचालकांना अतिकालीन भत्ता (ओव्हर टाईम) लागु करणेकामी सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ (१) नुसार आर्थिक व प्रशासकीय मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्रमांक** ४०४

**दिनांक** ११ /०३ /२०२४

उक्त प्रस्तावनेमध्ये नमूद वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अकाभ-२०२२/प्र.क्र.०७/सेवा-६, दि.०७/०८/२०२३ नुसार वाहन चालकांना मिळणाऱ्या अतिकालिक भत्त्याच्या कामाच्या वेळेमध्ये व प्रचलित दरामध्ये वाढ करण्यात आलेली असून शासनाचे विविध विभाग व त्याखालील निरनिराळ्या कार्यालयातील वाहन चालकांना ९ तास ४५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ काम केल्यास खालील शर्तीच्या अधिन राहून रु.१००/- प्रति तास या दराने अतिकालिक भत्ता लागु केलेला आहे.

१. कामाच्या दिवशी ९ तास ४५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ काम केल्यास (भोजन समय धरुन) आणि रविवार सुटीच्या दिवशी सुद्धा काम केल्यास दर तासाला रु.१००/- (अर्धा तास किंवा जास्त काम केल्यास पूर्ण तास धरण्यात येईल.)
२. वाहन चालकास एका महिन्यात मिळणारी अतिकालिक भत्त्याची एकूण रक्कम त्याच्या एकूण पगार (SALARY) ३०% पेक्षा जास्त असू नये.

त्याचप्रमाणे वाहन चालकांना सुधारित दराप्रमाणे सदर अतिकालिक भत्ता मंजूर करण्याबाबतचे अधिकार पूर्वीप्रमाणेच वाहनचालक ज्यांचे नियंत्रणाखाली काम करतात, त्या विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना राहतील याप्रमाणे उक्त शासन निर्णयामध्ये नमूद आहे.

त्याअनुषंगाने **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले वाहनचालकांना अतिकालीन भत्ता (ओव्हर टाईम) लागु करणेकामी** महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र.एमसीओ २०२०/प्रक्र. ७१ (भाग-२) नवि-१४, दि.०६/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ अ (१) तूरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सदर प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मंजूर करीत आहे.**

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

D:\2022-23\UMESHRN\Other\जनरल पत्र-2

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी

**प्रस्तावना :-**

विषय :- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील वऱ्हाळदेवी तलावात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणे व स्थापत्य कामे करणे.

"महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान" अंतर्गत **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील वऱ्हाळदेवी तलावात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणे व स्थापत्य कामे करणे.** या कामाबाबत **मा. श्री कपिल मोरेश्वर पाटील, राज्यमंत्री, पंचायत राज मंत्रालय, भारत सरकार** यांनी दि. ०१/०१/२०२४ रोजी मा. जिल्हा नियोजन अधिकारी, ठाणे. यांचे कार्यालयाकडे सादर केलेल्या पत्रानुसार मागणी केली असता, मा. जिल्हा नियोजन अधिकारी, ठाणे. यांचे सदर कामाचे अंदाजपत्रक सादर करणे बाबत **जा.क्र.जिवायो/नगरोत्थान/का-४/२०२३-२४/३७ दि. ०५/०१/२०२४ चे** पत्र प्राप्त झाले आहे. याकामी सार्वजनिक बांधकाम विभाग-एस.एस.आर. सन २०२२/२३ अन्वये रक्कम रु. ४,००,००,०००/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करुन सदर प्रस्ताव मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे प्रशासकीय मंजुरी करिता सादर करण्यांत आला असुन, सदर प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक ११/०३/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये प्रशासकीय ठराव करणेकामी मंजुरीस्तव सविनय सादर.

दिनांक :- 11/03/२०२४

ठराव क्रं. :- 803

"महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान" अंतर्गत **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील वऱ्हाळदेवी तलावात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणे व स्थापत्य कामे करणे.** याकामी सार्वजनिक बांधकाम विभाग-एस.एस.आर. सन २०२२/२३ अन्वये रक्कम रु. ४,००,००,०००/- इतक्या रक्कमेचे प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ)व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार वरिल नमुद कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज वाहिनी, ड्रेनेज मेनहोल व चेंबर दुरुस्ती करणे कामाकरीता प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ २६.५ चौ.कि.मी. असुन महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र.१ ते ५ मध्ये अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज वाहिन्या ब-याच वर्षापुर्वीपासुन अंथरण्यात आलेल्या असल्यामुळे ब-याच ठिकाणी नादुरुस्त होत असतात. तसेच दैनंदिन स्वरुपात ड्रेनेज वाहिन्या चोकअप होत असतात व काही नादुरुस्त झालेल्या ड्रेनेज वाहिन्यावरील प्राप्त होत असल्यामुळे ड्रेनेज वाहिनी वेळीच दुरुस्त करणे आवश्यक आहे.

सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता शहरातील जुनी ड्रेनेज वाहिनी, ड्रेनेज मेनहोल व चेंबर दुरुस्ती करीता वार्षिक कामाचे रु.३४,७७,९९८/- मात्रच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस दि. ०४/०३/२०२४ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळालेली आहे.

सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता कामासाठी भुयारी गटार जोडणी साहित्य, खरेदी बसविणे या लेखाशिर्षकाच्या अधिन राहुन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज वाहिनी,ड्रेनेज मेनहोल व चेंबर दुरुस्ती करणे कामी रु.**३४,७७,९९८/-** मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज वाहिनी, ड्रेनेज मेनहोल व चेंबर दुरुस्ती करणे** | **३४,७७,९९८/-** |

शासन आदेश क्र.एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) नवि-१४ दि. ०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज वाहिनी, ड्रेनेज मेनहोल व चेंबर दुरुस्ती करणे बाबतच्या कामाकरीता प्रशासकीय ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकीय ठराव क्रमाक:** ४०२ **दिनांक** ७/०३ **/२०२४**

सन २०२४-२०२५ करीता भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज वाहिनी, ड्रेनेज मेनहोल व चेंबर दुरुस्ती करणे बाबत कामास प्रशासकीय,आर्थीक मान्यता मिळणेकामी प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ करीता भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज वाहिनी, ड्रेनेज मेनहोल व चेंबर दुरुस्ती करणे बाबत रु.३४,७७,९९८/- मात्रच्या प्रस्तावास मान्यता देऊन प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय:- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात एका वर्षाकरीता व्हॉल्वमन सेवा पुरविणे कामाकरीता प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ २६.४० चौ.कि.मि. असून पाणी पुरवठा विभागाचे दैंनदिन कामकाज प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय चालते. सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षामध्ये प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणे कामी निविदेची मुदत ३१ मार्च २०२४ रोजी संपत आहे. भिवंडी शहराला स्टेम प्राधिकरण यांचेकडुन ७३ द.ल.लि. व बृहन्मुंबई महानगरपालिका कडून ४० द.ल.लि. तसेच मनपाचे स्वत:चे व-हाळ तलाव ५ द.ल.लि. असा एकूण ११८ द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा होत आहे.

महानगरपालिकेचे आस्थापनेवर पाणी पुरवठा विभागाकरीता ५० पदे मंजुर असून त्यामधील ४९ पदे भरलेली आहे. त्यापैकी मयत- ३, सेवा निवृत्त-७, बडतर्फ- १, पाईप लाईन व बोअरवेल दुरुस्ती करीता -४, अंपग- ६ व २ कर्मचारी पदवीधर असून संगणकाचे ज्ञान असल्यामुळे पाणी पुरवठा विभागाचे संगणकीय कामकाज पाहत आहेत. तसेच १ व्हॉल्वमन ठाणे महानगरपालिकेकडे वर्ग करण्यांत आलेला आहे. त्यामुळे सद्या २५ व्हॉल्वमन कार्यरत आहेत.

भिवंडी शहरातील वाढती लोकसंख्या व नव्याने विकसीत होणारे नागरीकांमुळे नवीन रहिवाशी क्षेत्र मोठया प्रमाणात विकसीत होत आहे. त्यामुळे भिवंडी शहराची वाढती लोकसंख्या व नव्याने विकसीत झालेले क्षेत्र विचारात घेता लोकसंख्येमुळे पाणी पुरवठयाचे झोन वाढलेले आहेत. शहरात अंदाजे ४१३ व्हॉल्व आहेत. एकात्मीक पाणी पुरवठा योजने अंतर्गत शहरात बांधण्यात आलेल्या १४ जलकुंभामधील ७ जलकुंभ कार्यान्वीत करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे शहरातील झोन निहाय व्हॉल्व उघडणे व बंद करणे करीता तीन पाळीमध्ये ११० ते १२० व्हॉल्वमनची आवश्यकता आहे. शहरात दैंनदिन पाणी पुरवठा वितरीत करणे करीता मनपाचे आस्थापनेवर व्हॉल्वमन कर्मचारी उपलब्ध नाहीत. त्यामुळे शहरात झोन निहाय वेळापत्रकानुसार व्हॉल्व उघडणे व बंद करणे करीता अडचण निर्माण होत असल्यामुळे सन्मा. नगरसेवक, पदाधिकारी तसेच नागरीक यांचे भ्रमणध्वनीवरुन व दुरध्वनीवरुन तक्रारी प्राप्त होत असतात. त्यामुळे प्रशासनाला नागरीकांच्या रोषास सामोरे जावे लागत आहे.

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरीता प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रामध्ये एकुण ६१ व्हॉल्वमन कंत्राटी कामगारांची निविदा मागविण्यांत आलेली होती. पंरतु सन २०२४-२०२५ या वर्षामध्ये पद्मानगर, श्रीरंगनगर व कापतलाव येथील नव्याने अंथरणेत आलेल्या जलवाहिनी मधून झोन निहाय पाणी पुरवठा करणे कामी ३ नवीन व्हॉल्वमनची आवश्यकता आहे.

सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात एका वर्षाकरीता एकूण ६४ व्हॉल्वमन (कंत्राटी कामगार) सेवा पुरविणे कामी रु.२,७०,९६,५१५/- मात्र रक्कमेस दि. ०१/०३/२०२४ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळालेली आहे.

भिवंडी नि.शहर महानगपालिके अंतर्गत ठेकेदारांव्दारे करण्यात येणाऱ्या कामावर कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना शासकीय नियमानूसार किमान वेतन लागू करणे आवश्यक आहे. सदर कामगारांना किमान वेतन लागू न केल्यास मूळ मालकास फौजदारी गुन्हा दाखल करणेची तरतूद आहे. तसेच शासन निर्णयानुसार मुळ वेतन व विशेष भत्त्यांमध्ये वाढ झाल्यास कंत्राटी कामगारांना मुळ वेतन व विशेष भत्ता देय असणार आहे.

त्याकरीता मा. सहा. कामगार आयुक्त सो. भिवंडी यांचे कंत्राटी पध्दतीने / ठोक वेतनावर अर्धकुशल व अकुशल कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणेबाबत प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे मुळ वेतन व विशेष भत्ता मिळुन वेतन निश्चित करणे बाबत दर प्राप्त करुन त्यास दि. १५/०२/२०२४ अन्वये मा.आयुक्त सो. यांची मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदर कामाकरीता रु. **२,७०,९६,५१५/-** मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात एका वर्षाकरीता व्हॉल्वमन सेवा पुरविणे सन २०२४-२५.** | २,७०,९६,५१५/- |

सद्या कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र.एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) नवि-१४ दि. ०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात एका वर्षासाठी व्हॉल्वमन सेवा पुरविणे बाबतच्या कामाकरीता प्रशासकीय ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकीय ठराव क्रमाक:** ४०१

**दिनांक** ७ /०३ /२०२४

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात एका वर्षाकरीता व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबत रु.२,७०,९६,५१५/- मात्रच्या प्रस्तावास तसेच शासन निर्णयानुसार मुळ वेतन व विशेष भत्त्यामध्ये वाढ झाल्यास कंत्राटी कामगारांना मुळ वेतन व विशेष भत्त्याची वाढ देय असणा-या प्रशासकीय व आर्थीक ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,पाणी पुरवठा विभागाकडील प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात एका वर्षाकरीता व्हॉल्वमन सेवा पुरविणे बाबत रु.२,७०,९६,५१५/- मात्रच्या प्रस्तावास मान्यता देऊन प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
O/C
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**